# नविन वर्षात शेतकऱ्यांसाठी बॅड न्यूज

**1 जानेवारीपासून खतांच्या किमतीत होणार वाढ ■ आर्थिक कोंडीने शेतकरी हैराण ■ शेती करायची तरी कशी ?**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )–** रासायनिक खतांच्या किमती आधीच जास्त असताना, खत उत्पादक कंपन्यांनी 1 जानेवारी 2025 पासून दरवाढ जाहीर केली. शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे.

शेतकऱ्यांना आधीच त्यांच्या उत्पादनांना योग्य बाजारभाव मिळत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. सोयाबीनचे दर वाढतील या अपेक्षेने शेतकऱ्यांनी विक्री थांबवली होती; मात्र, उलट दर कमी झाले. खत उत्पादक कंपन्यांनी 1 जानेवारी 2025 पासून रासायनिक खतांच्या किमती वाढवल्या आहेत. अशा परिस्थितीत, शेतकरी वर्गातून खतांच्या किमती वाढवण्याऐवजी कमी करण्याची मागणी होत आहे. त्यांना त्यांच्या उत्पादनांसाठी योग्य बाजारभाव मिळावा, तसेच शेतीसाठी आवश्यक इनपुट्सच्या किमती नियंत्रणात ठेवाव्यात, अशी त्यांची अपेक्षा आहे. एकीकडे शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला असताना, दुसरीकडे नवीन वर्षात खताचे भाव वाढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याने आम्ही शेती करायची, तरी कशी, असा सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

### अशा वाढतील किमती

उदाहरणार्थ, डीएपी (डाय- अमोनियम फॉस्फेट) खताची किंमत प्रति पिशवी 1 हजार 350 रुपयांवरून 1 हजार 590 रुपयांवर गेली आहे. टीएसपी 46 टक्के (ट्रिपल सुपर फॉस्फेट) खताची किंमत एक हजार 300 रुपयांवरून एक हजार 350 रुपयांवर वाढली आहे. 10-26-26 आणि 12-32-16 या खतांच्या किमती 1 हजार 470 रुपयांवरून 1 हजार 725 रुपयांवर वाढल्या आहेत.

# दोन दुचाकींच्या धडकेत एकाचा मृत्यू

## एक जखमी, पिंपळविहीर येथील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 ) –** नांदगावपेठ येथील पिंपळे विहीर परिसरात दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला, तर दुसरा तरुण जखमी झाला. 23 डिसेंबर रोजी रात्री 8 वाजता हा अपघात झाला. सुजित चंद्रशेखर राजगुरे (28, रा. माळीपुरा, मोर्शी) असे मृताचे नाव आहे.

माहितीनुसार, सुजित राजगुरे हे 23 डिसेंबर रोजी सायंकाळी नांदगावपेठ परिसरातील पिंपळे विहीर रोडने मोटारसायकल क्रमांक एमएच 32 एयू 9907 वर जावई आदित्य शिरभाते याच्यासोबत जात होते. यावेळी विरुद्ध दिशेने आलेल्या जीजे 15/एआर 8078 क्रमांकाच्या ?क्टिव्हा वाहनाने सुजितच्या मोटारसायकलला धडक दिली. समोरासमोर धडकल्याने सुजित आणि आदित्य जखमी झाले. नागरिकांच्या मदतीने दोघांनाही जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तपासून सुजित राजगुरे यांना मृत घोषित केले. जखमी आदित्य शिरभाते यांच्यावर उपचार सुरू झाले आहेत. वडील चंद्रशेखर विश्वनाथ राजगुरे यांच्या फिर्यादीवरून नांदगावपेठ पोलिसांनी अज्ञात मोपेड चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# 53 हजार रोखीची बॅग हिसकाविणाऱ्यांना अटक


**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 ) –** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लक्ष्मी नगर परिसरात चोरांनी एका इसमाची बॅग हिसकावून पळ काढला. त्याच्याकडील 53 हजारांची रोख होती. याप्रकरणात विजय पंजाबराव मानकर (वय 67) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला असून, दोन आरोपींना अटक केली आहे. अन्य आरोपींचा पोलिस शोध घेत आहेत.

माहितीनुसार, विजय मानकर हे गेल्या 13 वर्षांपासून महात्मा फुले सहकारी अर्बन बँकेत दैनंदिन पैसे संकलनाचे काम करत आहेत. 24 डिसेंबर रोजी नेहमीप्रमाणे ते लक्ष्मीनगर येथून दैनंदिन पैसे संकलनाचे काम करून निघाले होते. त्यानंतर पाच ते सहा तरुणांनी त्याला अडविले. त्यांनी विजय यांच्याजवळील बॅग जबरदस्तीने हिसकावण्याचा प्रयत्न केला. यावर विजय यांनी विरोध केला असता, त्यांनी त्याला जबरदस्तीने ढकलून बॅग घेऊन पळ काढला. बॅगमध्ये 53 हजार रुपये रोख रक्कम होती. घटनेनंतर विजय मानकर यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दिली. पोलिसांनी तक्रार नोंदवून दोन आरोपींना अटक केली आहे. अन्य आरोपींचा पोलिस कसून शोध घेत आहेत.

# 'विष्णुजी की रसोई' चा अमरावतीमध्येही राजेशाही थाट

**आर्टीस्ट दिनेश शिंदेंच्या कल्पनेतून हॉटेल ला 'महाल' चे रुप**













**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.25 )–** नागपूरातील खवय्यांच्या आवडीचा ठिय्या असलेला 'विष्णुजी की रसोई' आता अमरावतीमध्ये साकारण्यात आली आहे. मूळचे अमरावतीचे मात्र मुंबईमध्ये आर्ट डायरेक्टर म्हणून करिअर केलेले आर्टीस्ट दिनेश शिंदे यांच्या कल्पनेतून हॉटेल च्या वास्तूला प्रशस्थ अशा 'महल' चे रुप देण्यात आले आहे. डोक्यावर मे महिन्यातील रणरणते उन्हं, 35 कारागीरांचे रात्रंदिवस परिश्रम आणि 76 दिवसांच्या कालावधीत अमरावतीमध्ये पहिल्यांदा ही देखणी वास्तू उभी करण्याचे श्रेय दिनेश शिंदे यांना जाते.

कामाच्या शोधात 22 वर्षांपुर्वी मुंबई गाठणारे दिनेश शिंदे यांनी मुंबई, पुणे, बंगळुरु अश्या अनेक मेट्रो शहरांना आपली कला अवगत केली आहे, परंतू आपण अमरावतीमध्ये अशी वास्तू साकारावी, जी या अंबानगरीच्या मातीतल्या सुपुत्राने साकारली असल्याचा अभिमान सर्वांना असावा. हे त्यांचे स्वप्न होते. 'विष्णूजी की रसोई' च्या निमीत्त्याने त्यांना ही संधी मिळाली. अमरावतीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय मार्गावर मिल्ट्री कँटीनच्या बाजूला असलेले देशमुख मंगल कार्यालयाच्या वास्तूवर ठुमदार महल उभे करायचे होते. हे छोटसे आव्हान दिनेश शिंदे यांच्याकडे अवी असनारे यांच्या माध्यमातून आले. 29 हजार स्के.फुटमध्ये त्यांना आपल्या कल्पनेत असलेला महल उभा करायचा होता. जो स्केच च्या माध्यमातून त्यांनी कागदावर साकारला. हॉटेल मालकांना महल चा स्केच पसंत आल्यावर वास्तवातील महल उभा करण्यासाठी शिंदे यांचे 35 शिलेदार कामाला लागले.

### कलेसोबत स्वप्नाने आकार घेतला

कामाच्या शोधात जेव्हा मी अमरावती सोडली होती, तेव्हा पालकांच्या हाताबाहेर गेलेला युवक म्हणून माझी ओळख या शहराला होती. परंतू मुंबई मायानगरील अपार कष्ट उपसून मी माझ्या करिअरचा मार्ग शोधला. दिनेश शिंदे नेमकं करतो काय? हे या अमरावतीकरांना कोणत्या ना कोणत्या माध्यमातून माहिती व्हावं, त्यांना माझं काम त्यांच्या डोळ्यांनी पाहता यावे, असे माझे स्वप्न होते. अवीजी असनारे यांच्या माध्यमातून मला 'विष्णूजी की रसोई' च्या रुपाने पुरातन महल ची प्रतिकृती साकारण्याची संधी मिळाली. या वास्तुत माझ्या कलेसोबत स्वप्नांनाही पुर्णत्वाचा आकार मिळाला.

**दिनेश शिंदे, आर्ट डायरेक्टर, मुंबई.**

### 6 केमिकल आणि लोखंडाचा वापर

दिनेश शिंदे यांनी सांगितले की, पुरातन काळातील महल चा लुक देण्याकरिता नक्षीदार पुरातन कालीन गेट, तश्याच नक्षीमध्ये कंपाउंड, जाळी, मेघडंबरी साकारण्यात आली आहे. 6 केमिकल मिळून तयार केलेल्या फायबर व लोखंडाच्या पिंजऱ्याचा वापर करुन ही महल ची प्रतिकृती साकारण्यात आली आहे. जवळपास 55 लाख रुपये खर्च या महलच्या प्रतिकृतीला साकारण्यात आला आहे. रंगरंगोटी चे मेंटेनन्स वगळता पुढचे 40 वर्ष या स्ट्रक्चरला काहीच होणार नसल्याचा दावासुध्दा शिंदे यांनी 'महासागर' शी बोलताना केला आहे.




# ऑन युवर मार्क : आपल्या लक्षपुर्तीसाठी धावले शेकडो पावले!

**अटल दौड राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन' स्पर्धेत 3457 स्पर्धकांचा सहभाग**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )–** अमरावती येथे 'अटल दौड राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन' स्पर्धा बुधवार( दि. 25) उत्साहात पार पडली. या स्पर्धेत राज्यभरातून 3457 धावपटूंनी मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घेतला होता. पहाटेपासून मॅरेथॉन विविध गटातील शर्यतींना सुरुवात झाली. यावेळी ऑन युवर मार्क म्हणताच शेकडो पावले आपल्या लक्ष्य गाठण्यासाठी धावली.

गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा ?थलेटिक संघटना वतीने या स्पर्धेत हजारांपेक्षा अधिक धावपटूंनी सहभाग घेतला होता. अतिशय उत्कंठापूर्वक वातावरणात 21 कि.मी. अंतराची हाफ मॅरेथॉन सकाळी वेळेवर 5.30 वाजताच सुरू झाली. त्यानंतर अनुक्रमे 10, 8, 5 आणि 3 किमी अंतराच्या शर्यती पार पडल्या. या शर्यतीत अमरावती शहरातील विविध घटकांनी सहभाग नोंदवला. तसेच रन फॉर अमरावती उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. यावेळी मुख्य आयोजक तुषार भारतीय, गेल इंडिया कंपनीचे प्रा.रवी कोल्हे, माजी महापौर चेतन गावंडे, प्रशांत शेंगोकर, प्रा.अतुल पाटील, ऋक्षी खत्री, माजी नगरसेविका सुरेखा लुंगारे, रेखा भुतडा, सुनंदा खरड, रश्मी नावंदर, लता देशमुख, प्रणित सोनी, डॉ.श्याम राठी, डॉ.अजय कांत, डॉ.मिलिंद पाठक सोबतच अन्य मान्यवरांनी यांनी स्पर्धेला झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात केली.

### यांना मिळाली टीव्हीएस स्पोर्ट आणि ज्युपिटर गाडी

21 किमी हाफ मॅरेथॉन स्पर्धा मध्ये पुरुष गट मधून राजन यादव (नागपूर) व 21 किमी हाफ मॅरेथॉन स्पर्धा मध्ये महिला गट मधून साक्षी जडलाय(सातारा) या विजेत्यांना टीव्हीएस स्पोर्ट व ज्युपिटर गाडी बक्षीस म्हणून देण्यात आली. तसेच अन्य विजेत्यांना रोख रक्कम प्रदान करण्यात आली.


अटलजींनी भारतावर आजन्म प्रेम केले. भारताला यशाच्या उत्तुंग शिखरावर विराजमान करण्यासाठी आयुष्यातील प्रत्येक क्षण वाचला. प्रतिकूल परिस्थितीतही सतत झुंज देत भाजपाची विचारधारा समाजात रुजवली. आयुष्यात आलेल्या प्रत्येक जबाबदारीवर योग्य न्याय देत त्यांनी समाजाची सेवा केली. याच विशाल वटवृक्षाच्या समर्थ खांद्यावर भाजपाची वेल वाढली आज तोच वेलू गगनावर गेल्याच प्रत्यय आपण घेत आहोत. अशा या महान विभूतीचे स्मरण चिरकाल टिकावी, या उद्देशाने आमच्या संपुर्ण टीम ने या स्पर्धेचे आयोजन केले होते.

**तुषार भारतीय,**
**आयोजक राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा.**

21 किमी, 10 , 8 5 , 3 किमी अंतराच्या शर्यतींना बडनेरा रोड येथील दसरा मैदानातून प्रारंभ झाला. स्पर्धेचा प्रारंभ दसरा मैदान, राजापेठ, कवर नगर, फरशी स्टॉप, दस्तुर नगर, यशोदा नगर, काँग्रेस नगर, बियाणी चौक, वेल कम पॉईंट, पंचवटी चौक, राठी नगर, शेगाव नाका, विलास नगर, चौधरी चौक, जयस्तंभ चौक, जवाहर गेट, गांधी चौक, भुतेश्वर चौक, रवी नगर चौक, सातूर्णा चौक, साई नगर चौक, बेनाम चौक, नवाथे चौक व प्रारंभस्थानी असा होता. स्पर्धेअंती सर्व गटातील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम बक्षीस स्वरूपात प्रदान करण्यात आली. स्पर्धा अतिशय नियोजनबद्ध आणि सुरळीत पार पाडण्यासाठी स्पर्धेच्या मार्गावर पाणी , औषधे , बिस्किटे वेदनानाशक स्प्रे इत्यादीची व्यवस्था करण्यात आली होती . त्याशिवाय स्पर्धकाला काही त्रास झालाच तर त्याला त्वरित प्रथमोपचार कसा करता येईल इत्यादी सर्व प्रकारचे प्रशिक्षण सर्व स्वयंसेवकांना देण्यात होते . एखाद्या स्पर्धकाला जास्त त्रास झाल्यास स्पर्धेच्या मार्गावर सुसज्ज रुग्णवाहिका ठेण्यात करण्यात आली होती. आवश्यक पोलिस बंदोबस्त, वाहतूक पोलिस तसेच मोठ्या प्रमाणात शिक्षक आणि 500 हून अधिक स्वयंसेवक या स्पर्धेसाठी होते. स्पर्धकांची सुरक्षा ही महत्वाची असते. त्याची सर्व काळजी घेण्यात आली होते. यासोबतच स्पर्धेत वरिष्ठ पोलिस अधिकारी देखील सहभाग होता.

# नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या दोघांविरुध्द गुन्हा

## महानगरपालिकेची रामपुरी कॅम्प परिसरात मोहीम



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )–** महापालिकेच्या पथकाने प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री करणार्या दोन जणांवर कारवाईचा बडगा उगारला. महापालिका पथकाने रामपुरी कॅम्प परिसरात दोन जणांना ताब्यात घेऊन, त्यांच्याजवळील नायलॉन मांजा जप्त करून, गाडगेनगर पोलिसात तक्रार दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी क्रिश ललित छाबडिया (रा. रामपुरी कॅम्प, गाडगेनगर, संतोषी माता मंदिराजवळ लाईन न. 4) व हिमेश राजेश मिराणी (क्रीष्णानगर, गाडगेनगर) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

मनपा आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांच्या आदेशान्वये व वैद्यकिय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव यांच्या उपस्थितीत रामपुरी कॅम्प परीसरात प्रतिबंधित नायलॉन मांजा मोहिम राबविण्यात आली. यावेळी दोन तरुणांना नायलॉन मांजा विक्री करीत असल्याची माहिती मनपा पथकाला मिळाली. त्यानुसार मनपा पथकाने रामपुरी कॅम्प संतोषी माता मंदिराजवळ सापळा रचून दोन युवकांना नायलॉन मांजाची विक्री करतांना पकडण्यात आले. नियमानुसार प्रतिबंधात्मक नायलॉन मांजाचा दंड भरण्यास सांगितल्यावर दंड भरण्यास मनाई केली असता त्यांचेवर गाडगे नगर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर कार्यवाहीमध्ये पथक प्रमुख नोडल अधिकारी विक्की जेधे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, राजू डिक्याव तसेच स्वास्थ्य निरीक्षक इमरान खान, पंकज तट्टे, अनिकेत फुके उपस्थित होते.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# केळीच्या बागेत पार पडला भाऊसाहेबांचा 126 वा जयंतीउत्सव

## डॉ.पंजाबराव देशमुख राज्यस्तरीय 'केळी परिषद' पडली पार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.25 )** - पर्यायी पिक म्हणून विदर्भातील शेतकऱ्यांनी केळी पिकाचा विचार करावा यासाठी केळीच्या विविध जातींची माहिती देण्यासोबतच मशागत ते निर्यातीपर्यंतची संपूर्ण साखळी मांडणारी 'डॉ.पंजाबराव देशमुख राज्यस्तरीय केळी परिषद' आज श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रातील केळी बागांच्या परिसरात पार पडली.शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या 126 व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था आणि जैन इरिगेशन सिस्टीमच्या संयुक्त वतीने आयोजित या परिषदेचा हजारो शेतकऱ्यांनी लाभ घेतला.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित या केळी परिषदेचे उद्घाटन डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांचे हस्ते झाले.विधान परिषद सदस्य आमदार किरण सरनाईक, शेतकरी नेते व दै.देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे, प्रगतीशील केळी उत्पादक माजी खासदार अशोक मोहोळ उद्घाटन सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र,त्रिची चे संचालक डॉ.आर.सेल्वराजन, आंतरराष्ट्रीय केळी तज्ज्ञ व जैन इरिगेशन सिस्टीमचे उपाध्यक्ष डॉ.के.बी.पाटील, विठ्ठल गंगा फार्मर्स प्रोड्युसर कंपनी, निमगाव, सोलापूरचे संचालक डॉ.युवराज शिंदे, कृषी व जलतज्ञ डॉ. सुधीर भोंगळे, प्रशांत भोयर यांनी प्रमुख वक्ते म्हणून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

या परिषदेत केळीचे भरघोस उत्पादन घेणारे विदर्भातील पाच शेतकऱ्यांना 'डॉ.पंजाबराव देशमुख केळीरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.या शेतकऱ्यांमध्ये भगवंत महासिंग इंगळे, वरणा जिल्हा बुलढाणा, उमेश तुळशीराम भोंडे, अंजनगाव सुर्जी, विकास विजयराव देशमुख, पणज तालुका आकोट, कुंदन देवरावजी वाघमारे, पवनार आणि श्रीकांत छत्रपती धोंडे, इनायतपूर तालुका चांदूर बाजार यांचा समावेश होता. परिषदेला उपस्थित सर्व पाहुण्यांचा अध्यक्ष आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर, ॲड.जे.व्ही.पाटील पूसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य प्रा.सुभाष बनसोड, सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, आयोजन समिती सचिव प्राचार्य डॉ. समीर लांडे, सदस्य प्राचार्य डॉ.सी.एम.देशमुख, डॉ. नंदकिशोर चिखले, डॉ.ए.एच. ढोबळे, डॉ. आर.एस. खाडे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

या परिषदेचे आयोजन श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले.केळी परिषद आयोजन समितीचे अध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी आपल्या प्रास्ताविकातून आयोजनामागची भूमिका विषद केली. अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उद्घाटक कुलगुरू डॉ.शरद गडाख, आमदार किरण सरनाईक, संपादक प्रकाश पोहरे, माजी खासदार अशोक मोहोळ, डॉ.आर.सेल्वराजन यांनी उद्घाटन सोहळ्यात आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ.राजेश मिरगे यांनी केले तर आयोजन समितीचे सचिव प्राचार्य डॉ.समीर लांडे यांनी आभार मानले.

> शेतकऱ्यांच्या कालच्या व आजच्या स्थितीवर भाष्य केले. जेंव्हा शहरात राहणारे लोक उपाशी राहतात तेंव्हाच त्यांना शेतकऱ्यांची किमत कळते. शेती उत्पादनाला योग्य भाव मिळण्यासाठी मधले दलाल व विपणनाची व्यवस्था बदलणे आवश्यक असून ज्या दिवशी या कृषिप्रधान देशाचा शेतकरी देशाचा पंतप्रधान होईल, तेंव्हाच शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारेल, असे ते म्हणाले.
>
> **प्रकाश पोहरे, प्रमुख पाहुणे.**

> विदर्भातील परिस्थिती आणि पश्चिम महाराष्ट्रातील परिस्थिती वेगळी असून या परिस्थितीतून बाहेर निघण्यासाठी चार सूत्रीचा नवा प्रयोग डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने सुरु केला आहे.विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यातील एक गाव विद्यापीठाने दत्तक घेतले असून तेथेही चार सूत्री राबविण्यात येत आहे.उत्पादकता वाढविणे, उत्पादन खर्च कमी करणे, शेतमालावर प्रक्रिया करून त्याचे विपणन करणे आणि शेतीला दुग्ध व्यवसाय व इतर पूरक व्यवसायाची जोड देणे ही ती चार सूत्रे असून त्यामुळे अकरा गावांचे 22 टक्के उत्पन्न वाढले.महाराष्ट्राला हे रोल मॉडेल द्यावयाचे आहे. या परिषदेच्या आयोजनासाठी त्यांनी संस्थेचे अभिनंदन केले.
>
> **डॉ.शरद गडाख, कुलगुरू**

> शासनाने शेतकऱ्यांकडे लक्ष देण्याची परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी शेतकऱ्यांची असून जो पर्यंत शेतकरी अन्न धान्य पिकविणे बंद करून त्याच्या फायद्याची पिके घेणार नाही तो पर्यंत हे शक्य नाही. भाऊसाहेबांना आदरांजली म्हणून दरवर्षी संस्थेतर्फे कृषी संबंधी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत असून पुढच्या वर्षी आंबा परिषद व प्रदर्शनी भरविण्यात येणार आहे.शेतकऱ्यांनी या प्रक्षेत्राला भेट देऊन प्रोत्साहन घ्यावे.
>
> **हर्षवर्धन देशमुख,**
> **अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था.**

# थंडीचे पूनरागमन होणार

## हवामान तज्ज्ञांची माहिती



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )** - दक्षिण पश्चिम बंगालच्या उपसागरात आंध्र -तामिळणाडु किनारपट्टीवर ठळक कमी दाबाचे क्षेत्र आहे. यामुळे विदर्भात अंशत: ढगाळ वातावरण निर्माण झाले असून त्यामुळे किमान तापमानात 2 ते 4 डीग्रीने वाढ झालेली आहे. पुढील चार दिवस किमान तापमान 16-20 डीग्री दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच 29 डिसेंबरपासून थंडीचे पुनरागमन होण्याची शक्यता आहे. अशी माहिती हवामान तज्ज्ञ अनिल बंड यांनी दिली.

माहितीनुसार, 26 डिसेंबर रोजी विदर्भात वातावरण अंशत: ढगाळ आणि कोरडे राहील. 27 व 28 डिसेंबर रोजी ऐक सक्रिय पश्चिमी विक्षोभ पश्चिम हिमालयावर हवेच्या मधल्या आणि खालच्या थरात कार्यरत आहे. त्यामुळे राजस्थान वर चक्राकार वारे निर्माण झाले आहे. वरील दोन्ही हवामान प्रणालीच्या प्रभावामुळे मध्य भारतात अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातुन बाष्पयुक्त वारे येण्याची शक्यता आहे. परिणामी विदर्भात या कालावधीत विखुरलेल्या स्वरुपात हलक्या मध्यम पावसाची शक्यता आहे. तसेच तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. 29 डिसेंबरपासून वातावरण क्लिअर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आंब्याच्या मोहोराचे रक्षण करणे आवश्यक आहे. तसेच हरभरा पीकाचे पाणी नियोजन करणे आवश्यक आहे. अशी माहिती श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाचे प्रा.अनिल बंड यांनी दिली.

## अनिल बजाज यांचे निधन



**चांदूर रेल्वे** - चांदूर रेल्वे शहरातील प्रतिष्ठित व्यापारी, माजी न.प. उपाध्यक्ष अनिल सुंदरलाल बजाज (अन्नुसेठ) यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी दु:खद निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी पद्माबाई, मुलगा योगेश व पवन, 4 मुली, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर स्थानिक हिंदू श्मशानभूमीमध्ये बुधवारी अंतिम संस्कार करण्यात आले.

# अमरावती शहरासाठी 1,718 कोटींची भुयारी गटार योजना प्रस्तावित

## सुलभा खोडके यांचा पाठपुरावा : सुधारित कृती आराखड्यात समावेश



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.25 )**- शहरी भुयारी गटार योजनेच्या अनुषंगाने अमृत टप्पा-1 अंतर्गत रखडलेल्या भुयारी गटार योजनेच्या कामांचा आता केंद्र पुरस्कृत अमृत टप्पा दोनच्या सुधारित कृती आराखड्यात समावेश करण्यात आला आहे. याकरिता 1 हजार 718 कोटी रुपये प्रस्तावित करून तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्यामुळे लवकरच हा प्रस्ताव मंजूर करून आणून अमरावती शहरात भुयारी गटार योजनेच्या कामांना गती देणार असल्याची माहिती आमदार सुलभा खोडके यांनी दिली आहे.

अमरावती शहरात रखडलेल्या भुयारी गटार योजनेकरिता माननीय उच्च न्यायालयात रिपिटिशनल याचिका स्वीकृत झाली आहे. त्यामुळे सदर भुयारी गटार योजनेच्या अनुषंगाने सध्याच्या स्थितीविषयी आमदार सुलभा खोडके यांनी माहिती दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, केंद्र पुरस्कृत अमृत अभियानअंतर्गत टप्पा-1 योजना सन 2018 मध्ये मंजूर झाली होती. परंतु निधीअभावी ही थंडबस्त्यातच होती. दरम्यान, 2019 मध्ये आमदार म्हणून निवडून आल्यानंतर 6 डिसेंबर 2019 रोजी अमृत एक अंतर्गत पाणीपुरवठा व भुयारी गटार योजनेसंदर्भात मजीप्रा कार्यालयात आढावा बैठक घेतली होती. यावेळी तत्कालीन उपविभागीय अभियंता यांनी भुयारी गटार योजनेचे 28 टक्के काम पूर्ण झाले व 20.31 कोटी इतका निधी खर्च झाल्याची माहिती दिली होती.

त्यानंतर 25 एप्रिल 2022 रोजीही बैठक घेतली. यामध्ये शहराच्या वाढत्या लोकसंख्येचे अनुमान लक्षात घेता तसेच योजनेचे आयुर्मान (कालावधी) संदर्भातसुद्धा नियोजन नसल्याने ही योजना आगामी दृष्टीने परिपूर्ण नसल्याचे बैठकीतून समोर आले होते. त्यामुळे अमृत टप्पा- 1 मधील भुयारी गटार योजनेतील उर्वरित कामांना अमृत टप्पा दोनमध्ये समाविष्ट करण्यात यावे तसेच वर्ष 2054 पर्यंतची शहराची लोकसंख्या गृहीत धरून तसा परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना मजिप्राला दिल्या होत्या. त्यानंतर मजीप्रा प्रशासनाच्यावतीने परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला.

योजनेला गती देण्याच्या अनुषंगाने 10 डिसेंबर 2024 रोजी मजिप्रात बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये सुलभा खोडके यांच्या सुचनेनुसार अमृत टप्पा 20.312 चा सुधारित कृती आराखडा तयार करून यामध्ये 1 हजार 718 कोटी प्रस्तावित रक्कम आहे. हा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केल्याची माहिती सुलभा खोडके यांनी दिली.

# वरुड ते पुसला राष्ट्रीय महामार्गाच्या अपूर्ण कामाला हिरवा कंदील

## आ.चंदू यावलकर यांच्या प्रयत्नामूळे वनविभागाची मंजुरी

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.25 )**- वरुड ते पुसला या राष्ट्रीय महामार्गाचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी आमदार यावलकर यांच्या प्रयत्नाला यश आले. आता ते काम लवकरच पूर्ण होईल असे आमदार चंदू यावलकर यांच्याकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे पुसलावासियांची बरेच दिवसाची प्रतीक्षा आता पूर्ण होणार आहे, यात तीळमात्र शंका नाही.

मागील 8 वर्षापासून नांदगाव पेठ ते पांढुर्णा हा राष्ट्रीय महामार्ग पूर्ण झाला आहे, परंतु वरुड ते पुसला यादरम्यान वनविभागाच्या अडचणीमुळे तो पूर्ण होऊ शकला नाही. त्यामुळे या ठिकाणी अनेक अपघात होऊन जीवित हानी सुद्धा झाली. या विरोधात परिसरातील नागरिकांनी अनेक वेळा आंदोलने केलीत प्रसंगी रास्ता रोकोसुद्धा केला. परंतु या रस्त्याची अद्याप पर्यंत कुठल्याही लोकप्रतिनिधीने दखल न घेतल्यामुळे हा रस्ता पूर्ण होऊ शकला नाही. अशा परिस्थितीमध्ये नवनिर्वाचित आमदार चंदू यावलकर यांनी या रस्त्याची कैफियत केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मांडली. त्यांनी रस्त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन चंदू यावलकर यांची मागणी पुर्ण करत वनविभागाची मंजुरी मिळवून दिली. आता हा रस्ता लवकरच पूर्ण होणार असून या रस्त्यावरील होणारे अपघात आता तूर्तास कमी होणार यात शंकाच नाही.

### कार्यकारी अभियंता यांना मिळाले आदेश



मुख्य वनरक्षक महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग यांना एका पत्रान्वये आदेश दिले. दि.24 डिसेंबर 2024 रोजी मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक यांचे पत्रानुसार महेंद्री संवर्धन राखीव क्षेत्रातून जात असलेल्या 4.55 किलोमीटर रस्त्याचे अस्तित्वातील रुंदीमध्ये दुरुस्ती व मजबुतीकरण करणेबाबत नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. यासोबतच मोर्शी ते वरुड रस्त्यादरम्यान असलेले राखीव जमिनीवरील रस्त्याचे दुरुस्ती करण्याबाबत नाहरकत देण्यात आले. आता लवकरच रस्त्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून आमदार उमेश यावलकर यांचे आभार व्यक्त केले आहे.

## होमिओ डॉक्टर्स असोसिएशनची व्याख्यानमाला



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )**- महाराष्ट्र होमीओ डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने दि 22 डिसेंबर रोजी अमरावतीचे स्त्रीरोग तज्ञ डॉ. उमेश सावरकर यांचे व्याख्यान हॉटेल रंगोली पर्ल या ठिकाणी पार पाडले.

ह्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अमरावतीच्या सुप्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. ज्योती सावरकर व डॉ.सावरकर उपस्थित होते. मंचावर संघटनेचे अध्यक्ष डॉ.राजीव रोडे, डॉ.मनोज चौधरी, प्रकल्प प्रमुख डॉ. शितल चौधरी, डॉ. ज्योती जावरकर उपस्थित होते.

सर्वप्रथम डॉक्टर सॅम्युएल हॅनिमन यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्या दरम्यान अध्यक्ष सचिव प्रकल्प प्रमुख डॉ. शितल चौधरी सह प्रकल्प प्रमुख डॉ. विक्की पिंजाणी त्यानंतर डॉ. शितल चौधरी यांनी प्रोजेक्ट रिपोर्ट सादर केले. प्रमुख अतिथी डॉ. ज्योती जावरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. होमिओपॅथिक असोसिएशनचे पूर्वअध्यक्ष डॉ. गुणवंत डहाणे यांनी सी सी एम पी बद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.स्नेहा पिंजाणी यांनी केले. यानंतर सुप्रसिद्ध डॉ. उमेश सावरकर यांनी वंधत्व, स्त्री रोग या विषयावर बेसिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक डॉ. प्रिया मोहोड व डॉ.पल्लवी चौधरी यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. मनोज चौधरी यांनी केले. व्याख्यानमालेला यशस्वी करण्यासाठी पूर्वाध्यक्ष डॉ. गुणवंत डाहाणे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमासाठी एमएचडीए संघटनेचे पुर्वाध्यक्ष महिला प्रतिनिधी तालुका प्रतिनिधी सदस्य बहुसंख्येने उपस्थित असल्याची माहिती पीआरओ डॉ. शितल आचार्य यांनी दिली.

# तहसील कार्यालयात ग्राहक दिन साजरा





**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.25 )** - अखिल भारतीय ग्राहक पंचायत तसेच पुरवठा विभाग तहसील कार्यालयाच्या वतीने मंगळवार (दि.24) ला राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नरेंद्र खंडेलवाल होते. तसेच नायब तहसीलदार अ.रा.पाटणे, वरुड तालुका ग्राहक पंचायतचे अध्यक्ष प्रकाश पोकळे, सहसचिव निशा पानसे, सल्लागार तारा बारस्कर, संघटक डॉ.कंठराव यावलकर, उपाध्यक्ष डॉ.रवी यावलकर, कमलाकर देशमुख,

ग्रा.प.पदाधिकारी उषा शेदुर्से, प्रा. किशोर तडस, प्रा.व्ही.आर.देशमुख उपस्थित होते. 24 डिसेंबर हा उपभोक्ता दिवस म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. या प्रसंगी वरील मान्यवरांचे भाषणे झालीत. ग्राहकांचे अधिकार कर्तव्य जागरूकता याबाबत अनेक मुद्दे मांडण्यात आले. वस्तू, विक्रेता व ग्राहक यातील संबंधाबाबत माहिती देण्यात आली. सन 1986 ते 2019 नवीन ग्राहक संरक्षण कायदा व तक्रारीचे निराकरण स्थानिक तसेच जिल्हा तक्रार निवारण कमिटी येथे कसे दाखल करता येतील, ग्राहकांचा संबंधी नवीन कायद्यामध्ये काय तरतूद आहेत. याबाबत ग्राहक पंचायतचे अध्यक्ष प्रकाश पोकळे यांनी स्पष्ट केले. देशमुख यांनी नगरपालिका क्षेत्राबाबत तक्रारी मांडल्या त्यावर उपाय कसे करता येतील याबाबत माहिती दिली. डॉ.नीलकंठ यावलकर यांनी ग्राहक व दुकानदार यामधील व्यवहार तसेच दुकानदार यांचे प्रामाणिकपणा व पारदर्शकता ग्राहकासंबंधीचे अधिकार यासंबंधी अनेक उदाहरणे दिली. नरेंद्र खंडेलवाल यांनी तक्रारीच्या निराकरणाबाबत अनेक मार्गदर्शन सुचवले. प्रा.किशोर तडस यांनी ग्राहक आणि दुकानदार याबाबत सखोल स्पष्टीकरण देऊन उदाहरण सादर केली. तालुकास्तरावर अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे तक्रार निवारण केंद्र निर्माण व्हावे व ग्राहकांच्या तक्रारी सुलभ सोडवता याव्या याकरिता प्रस्ताव मांडण्यात आले. आलेल्या तक्रारीचे निराकरण यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाला अन्य मान्यवरही उपस्थित होते.

# शालेय शिक्षणापेक्षा पालकांचा शिकवणीवर्गाकडे कल



***महासागर प्रतिनिधी***

***चुरणी,( दि.25 ) - विद्यार्थी नियमीत शाळेत यावा, त्याने चांगला अभ्यास करावा, गरीबी त्याच्या शिक्षणाच्या आड येवू नये याकरिता शासन विद्यार्थ्यांना गणवेश, पुस्तके, सायकल, वह्या, प्रवास खर्च अशी विविध खर्च करते. शाळेतच गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्याकरिता विविध उपक्रमही राबविल्या जातात. मात्र तरीही शाळेतील शिक्षणापेक्षा विद्यार्थी व पालकांचा कल शिकवणी वर्गाकडे अधिक असल्याचे दिसून येत आहे.***

आजचा विद्यार्थी हा अधिक प्रगल्भ आहे, कर्तबगार आहे. विचारवंत आहे. त्याला आपल्या हक्काची जाणीव आहे व आपला हक्क अबाधित राखण्यासाठी तो जागरूक असतो. म्हणूनच या स्पर्धेच्या युगात आपला पाल्य जास्तीत जास्त गुणांनी उत्तीर्ण व्हावा, त्याने इतर विद्यार्थ्यांपेक्षा अधिक गुण मिळवावे, अश पालकांची अपेक्षा असते व त्यासाठी पालकसुद्धा आपल्या पाल्याच्या शिकवणी वर्गासाठी पाण्यासारखा पैसा खर्च करतात. आधुनिक स्पर्धेच्या युगात पालक पाल्यांना नर्सरी, केजी

### बालवयातच शिक्षणाचे ओझे

1, केजी 2 पासूनच इंग्रजीचे संस्कार करतात. अगदी तीन ते चार वर्षाच्या बालवयातही आपल्या मुलाने चांगले गुण मिळवावे, तसेच शिकवणी वर्गाच्या माध्यमातून अपेक्षित शिक्षणात उंचीवर जाऊन यश मिळवावे, अशी प्रत्येक पालकांची अपेक्षा असते.

### कॉन्व्हेंट पासूनच शिकवणी वर्ग

पालक अंगणवाडी किंवा कॉन्व्हेंटमध्ये असतानाच मुलांसाठी शिकवणी क्लासेस लावतात. दहावी, बारावीसाठी तर ट्युशन क्लासेस लावण्याची जणू स्पर्धाच लागलेली असते. त्यानंतरही पुढील त्या-त्या शिक्षण क्षेत्रासाठी हमखास शिकवणी वर्गाची आवश्यकता असल्याचे पालकांना वाटते. अपेक्षित शिक्षणात आपल्या गुणांचे, कष्टांचे चीज होत नसल्याचे पाहून पर्यायी शिक्षण घेऊन मिळवितो. जॉब करतो किंवा अपेक्षित यश न मिळाल्याने अनेक जण टोकाचा निर्णयसुद्धा घेतात, असेही निदर्शनास येत आहे.

### लाखो रुपये भरुन प्रवेश

जेईई/सीईटी क्लासेससाठी विद्यार्थी नामवंत ट्युशन क्लासेसमध्ये लाखो रुपये भरून प्रवेश घेतात, मात्र हजारो विद्यार्थ्यांमधून काही मोजकेच विद्यार्थी यशस्वी होतात. या स्पर्धेच्या युगात शिकवणी वर्गाचे वेड सर्वत्र पसरलेले दिसत आहे. शाळेच्या शिक्षणापेक्षाही शिकवणी वर्गातील शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जात असल्याचे सध्या दिसून येत आहे.